# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक कार्य

**पांडूरंग पंडित पाटील** राज्यशास्त्र विभाग , संशोधन विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे समाजसुधारक, विचारवंत, अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, कायदेपंडित, घटनाकार, नामवंत संसदपटू, संपादक, लेखक, नामवंत वकील, प्राध्यापक, एक अभ्यासू आमदार, खासदार असे बहुआयामी पद्धतीने कार्य केले आहे. डॉ.आंबेडकर यांनी १९४२ ते १९४६ या काळात केंद्रीय श्रम, रोजगार, ऊर्जा मंत्री म्हणून कार्य केले आहे. केंद्रीय श्रम मंत्री पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर डॉ.आंबेडकर म्हणाले, "आता काळ बदलला आहे. सत्तेच्या व कायद्याच्या जोरावर कामगारवर्गाला दडपणे शक्य नाही. कामगार हा मनुष्य आहे व त्याला मानवाचे हक्क मिळाले पाहिजेत. सध्या सरकार पुढे तीन प्रश्न आहेत. एक तडजोडीचा, कामगारांचे निश्चित वेतन, अटी, कामगार-मालक यांच्यातील सौहादपूर्ण संबंध! कामगारांचे राहणीमान उंचावले पाहिजे. आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे. मी नेहमीच कामगार वर्गाच्या बाजूने उभा राहीन." असे मत व्यक्त केले त्यांच्या या विचारातून त्यांच्या कार्य विषय असलेली सचोटी लक्षात येते.

**उद्दिष्टे :**

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा अभ्यास करणे
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामागार विषयक कार्याचा आढावा घेणे

**विषय विवेचन :**

भारतीय राज्यघटनेत डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी कामगारांच्या हक्कांचे रक्षण केले आहे. संविधानाप्रमाणे, "कामगार" हा भारतीय राज्यघटनेच्या अंतर्गत "समवर्ती सूची" मधील एक विषय आहे जेथे केंद्र आणि राज्य सरकारे दोन्ही केंद्र सरकारसाठी काही बाबींच्या आरक्षणासाठी कायदा करण्यास सक्षम आहेत.

**कामगारांच्या हितासाठी राजकीय पक्षाची स्थापनेतून कार्य :**

. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३६ ला त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. ते अध्यक्ष होते. पक्षाचा जाहीरनामा 'टाइम्स ऑफ इंडिया' या इंग्रजी दैनिकात पहिल्यांदा प्रकाशित करण्यात आला होता. या जाहीरनाम्यात ध्येय - धोरणे अतिशय सूक्ष्म पद्धतीने विचार करून ठरविली होती.

• पक्षाचे धोरण स्वष्ट करण्यासाठी दलित वर्ग कर्मचारी परिषद १२,१३ फेब्रुवारी १९३८ ला मनमाड येथे झाली. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हटले होते, 'ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही हे भारतीय कामगारांचे दोन शत्रू आहेत.'

• १७ मार्च १९३८ मुंबईच्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या सर्वधारण सभेत डॉ. आंबेडकर म्हणाले - 'गरिबांच्या पक्ष गरिबांनी चालविला पाहिजे.' हा निर्लेप आशावाद क्षितिजा पलीकडचा होता यात शंका नाही. सामाजिक अन्याय, अत्याचारा विरूद्ध, आर्थिक विषमते विरूद्ध कामगारांनी लढा दिला पाहिजे तेव्हाच कामगार संघटनेच्या बळावर प्रश्न सुटतील. तसेच 'परावलंबी असण्यापेक्षा स्वावलंबी व्हा' असा संदेश डॉ. आंबेडकरांनी दिला होता.

• १५ सप्टेंबर १९३८ च्या ट्रेड डिस्प्युट बिलाच्या संदर्भात कौन्सिल मध्ये डॉ. आंबेडकरांनी कामगाराचा अधिकार आणि मालकाने लादलेली बंधने याचा कडाडून विरोध केला. डॉ. आंबेडकरांच्या मताशी सहमती दर्शवून जमनादास मेथाने डिस्प्युट बिलाचा विरोध केला होता. याच पार्श्वभूमीवर ७ नोव्हेंबर १९३८ला स्वतंत्र मजूर पक्ष आणि गिरणी कामगारांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप करण्याचा निर्धार केला होता. जमनादास मेथा यांच्या अध्यक्षते खाली श्रीपाद डांगे, परुळेकर, मिरजकर इत्यादी कामगार नेत्यांनी व डॉ. आंबेडकरांनी संप यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला होता. हा संप अयशस्वी व्हावा यासाठी गिरणी मालकाने पोलिस बळाचा वापर केला. त्यात ७२ कामगार जखमी झाले. ३५ कामगारांना अटक झाली. पण संप यशस्वी झाला. कामगार संघटनांचा विजय झाला. स्वतंत्र मजूर पक्ष बळकट झाला. या कामगारांच्या लढ्यामुळे मालक, भांडवलदार वर्गात प्रचंड खळबळ माजली होती.

**१९४२ साली कामगार मंत्री असताना कार्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर २० जुलै १९४२ रोजी व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून सामील झाले. त्यांना कामगार खात्याची जबाबदारी सांभाळण्यास सांगण्यात आले. मुंबईच्या विधान परिषदेचे सदस्य आणि व्हाइसरॉयच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य या नात्याने भारतातील कामगार कायद्यात त्यांचे योगदान मोठे होते. ६ आणि ७ सप्टेंबर १९४३

रोजी नवी दिल्ली येथे कामगार मंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय प्रभावी भाषणात श्रमिकांच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, सांस्कृतिक सुविधा आणि आरोग्य संसाधनांच्या मागण्या स्पष्ट केल्या.

**सेवा योजन कार्यालयाची (एम्प्लॉयमेंट एक्सचेंज) स्थापना :**

त्याकाळी जे अनुभवी व अर्धाशिक्षित तज्ज्ञ निरनिराळ्या योजनातून तयार होत होते. त्यांना नोकरीसाठी भटकावे लागू नये, त्यांना नोकरी मिळविण्याचे मार्ग मोकळे असले पाहिजे, हा सेवा योजन कार्यालय स्थापण्याचा मुख्य उद्देश होता.

**भारतिय खाण कायदा १९४६ :**

भारतीय खाणी मध्ये भारतातील कामगारांना काम करण्यासाठी फारशी संधी दिली जात नसे. इंग्लंड मधून कामगार आयात केले जात. डॉ. आंबेडकरांनी या आयातीवर प्रतिबंध लावला. भारतातील कामगारांना खाणी मध्ये कामावर घेतले जाऊ लागले. अस्पृश्यांना डावलले जायचे. डॉ. आंबेडकरांच्या कायद्यामुळे त्यांनाही खाणीत काम करता येऊ लागले. काही जिगरबाज स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून खाणीत काम करू लागल्यात. ते पाहून डॉ. आंबेडकरांना आश्चर्याचा धक्का बसला. मजूर मंत्री म्हणून खाण महिला आणि कामगारांसाठी कायद्यात विशेष तरतुदी केल्या. `भारतिय खाण कायदा १९४६' तयार करुन स्त्री कामगारांना खाणीत जमिनीच्या आत मध्ये काम करण्यास व रात्रपाळीस बंदी केली. तसेच कायद्याद्वारे कामगार कल्याण निधी ठेवण्याच्या तरतुदी केल्या आहेत. कल्याण निधी म्हणून ठेवलेला पैसा कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कल्याणाशी संबंधित कामांसाठी वापरला जाणार होता. त्यासाठी त्यांनी पाच वेगवेगळ्या प्रकारच्या कामाच्या स्वरूपामध्ये पाच कामगार कल्याण निधी ठेवण्याची सूचना केली आहे.

**किमान वेतन कायदा, १९४८ :**

या कारखाना कायद्यांतर्गत, त्यांनी सुधारणांसह तरतुदी केल्या आहेत त्या खालीलप्रमाणे

- कामगारांना प्रौढ कामगारांना कामावरून १० दिवसांची आणि बाल कामगारांना १४ दिवसांची पगारी रजा देण्याचा लाभ दिला आहे.
- अखर्चित पगाराच्या रजेच्या बाबतीत भरपाई रजा मिळण्याची तरतूदही करण्यात आली आहे.
- ओव्हरटाईम वेतन मिळण्याची तरतूदही केली होती. या अंतर्गत जर कोणताही कामगार दिवसातील ८ तासांपेक्षा जास्त किंवा आठवड्यातून ४८ तासांपेक्षा जास्त काम करत असेल, तर त्याला नियोक्त्याकडून ओव्हरटाईम वेतन मिळण्याचा अधिकार होता. तसेच हे ओव्हरटाईम वेतनाचे दर सामान्य वेतनापेक्षा जास्त असावेत. दिवस आणि आठवड्यासाठी जास्तीत जास्त कामाच्या तासांची तरतूद करणे हे देखील केवळ त्यांच्याच विचारात होते. सध्याच्या काळातही तेच पाळले जात आहे.

**महिला कामगार विषयक कार्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली होती. भारतातील महिलांचा दर्जा कामगार कल्याणाच्या दृष्टीने उंचावण्यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्वाचे योगदान दिले आहे.

गरोदर महिलांना लाभ देण्यासाठी आणि बाळंतपणाच्या वेळी आणि बाळाच्या संगोपनाच्या सुरुवातीच्या दिवसांत विश्रांती घेण्यासाठी १९४१ चा खाण मातृत्व लाभ कायदा आणला आहे. कायद्यानुसार, प्रसूती रजेचा लाभ कालावधी १६ आठवड्यांपर्यंत वाढवण्यात आला होता, ज्याचे दोन भाग अशा प्रकारे केले जाऊ शकतात की, महिला कर्मचाऱ्याला बंदिवासात ठेवण्यापूर्वी १० आठवडे आणि बंदिवासानंतर ६ आठवड्यांची रजा घेता येईल. या प्रसूती रजेच्या कालावधीत पूर्ण वेतन मिळण्याची तरतूद करण्यात आली होती आणि ती फक्त नियोक्त्याच्या बाजूने द्यावी लागते. गर्भधारणेच्या काळात कोणत्याही महिलेला नोकरीवरून काढून टाकता येत नाही किंवा नोकरी सोडता येत नाही, जर असे काही घडले तर ते कायद्याच्या न्यायालयात बेकायदेशीर ठरविण्यात आले. यामुळे महिला कर्मचाऱ्यांना तिच्या गरोदरपणात योग्य विश्रांती मिळण्यास आणि बाळाच्या जन्मानंतर तिचा रोजगार चालू ठेवण्यास मदत होत आहे. याचा परिणाम महिलांच्या कर्मचाऱ्यांच्या सहभागाचे दर वाढण्यात झाला. कारण, स्त्रिया बाळाच्या जन्मानंतर पुन्हा कामावर रुजू होऊ लागल्या.

**संपा विषयक भूमिका :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे असे मत होते की, संप करण्याचा अधिकार कार्यकर्त्यांना आहे; पण संपाचे हत्यार जपून वापरावे आणि ते कार्यकर्त्यांच्या फायद्यासाठी असले पाहिजे, पक्षाच्या राजकीय हेतूसाठी नाही. आज आधुनिकीकरणाच्या जगात प्रत्येक कामगार संघटना राजकीय उद्दिष्टांसाठी संपाचे हत्यार वापरत आहे आणि विकास प्रक्रियेत अडथळा बनत आहे. त्यांनी असे सूचवले आहे की, अखिल भारतीय कामगार महासंघाने एकत्र येऊन असे धोरण तयार करावे जे सर्व कामगार वर्ग आणि सरकारी सेवेतील पुरुषांना समानतेने लागू करता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी

प्रत्येक विभागासाठी विविध कामगार संघटनांना विरोध केला. रेल्वेमेन्स युनियन पोस्ट्स आणि टेलिग्राफ्स युनियन, टेक्सटाईल युनियन. वेगळ्या युनियनमुळे कामगारांचे प्रश्न सुटत नाहीत आणि सरकारकडून मागणी पूर्ण होत नाही. (महाराष्ट्र शासन, 1991, पृ.245)

**औद्योगिक परिषद**

श्रममंत्री म्हणून काम करताना डॉ.आंबेडकरांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. उद्योजक आणि कामगार यांचे प्रश्न सोडविण्यासाठी औद्योगिक परिषद स्थापन करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. कामगारांना त्यांचे हक्क, वेतन, कामाचे तास, विमा, आरोग्य संरक्षण अशा अनेक बाबतीत संरक्षण मिळावे म्हणून कामगार कायद्यामध्ये बदल करुन समानता आणली. औद्योगिक तंटे मिटावे म्हणून एक संहिता तयार करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. कामगार आणि केंद्र सरकार यांच्यामध्ये समन्वय राहावा म्हणून कामगार विषयक परिषद घेण्यासाठी ते नेहमीच आग्रही राहिले. अशा परिषदामध्ये कामगार, कामगार नेत्या बरोबरच कारखान्याच्या मालकांनाही त्यांनी बोलवावयाचा पायंडा पाडला. त्याचा परिणाम असा झाला की, मालक आणि कामगार या दोघांनाही एकमेकांचे प्रश्न समजले. वेळोवेळी होणारे कामगारांचे उपोषण, संप, मोर्चे या साऱ्या गोष्टी कमी प्रमाणात घडू लागल्या. एकूणच कामगारांच्या कल्याणासाठी त्यांनी केलेल्या उपाययोजना महत्त्वपूर्ण ठरल्या. आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेच्या संचालक मंडळाच्या धर्तीवर केंद्रात स्थायी सल्लागार समिती स्थापन करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यात केंद्र सरकारचे प्रतिनिधी, प्रांताचे प्रतिनिधी, राज्याचे प्रतिनिधी, कारखानदाराचे प्रतिनिधी, कामगारांचे प्रतिनिधी राहतील, अशी व्यवस्था केली. तसेच कुशल आणि अर्धकुशल कामगारांसाठी रोजगार विनियम केंद्र स्थापन करण्यासाठी चालना दिली. अशा केंद्रात प्रांतिक सरकारच्या प्रतिनिधींचा समावेश केला. कामगारांचे प्रश्न, अडचणी समजून घेता याव्यात, त्यांचे प्रश्न सोडवता यावे, कामगार-मालक संघर्ष टाळता यावा, कामगार मालक संबंध मैत्रीचे राहावेत म्हणून विविध उद्योगांमध्ये "लेबर ऑफिसर्स" नियुक्त करण्यासाठी त्यांनी निर्णय घेतला.

**निष्कर्ष :**

डॉ.बाबासाहेब आंबेडरांनी कामगारांच्या हितासाठी विविध कार्य करून त्याना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. त्यांनी कोणताही लिंग-भेद न करता प्रत्येक स्त्री-पुरुषास समान कामास समान वेतन मिळावे, पूर्वी १२ ते १४ तास कामगारांचे काम चालत असे, त्याऐवजी प्रत्येक दिवशी केवळ आठ तासांची शिफ्ट व जादा काम केल्यास अतिरिक्त कामाचा दुप्पट मोबदला मिळणे, एम्प्लॉयमेंट एक्सचेंजची स्थापना, भारतीय श्रमिक संघ अधिनियमाची सुधारणा करून कामगार संघटनांना अनेक अधिकार दिले, कामगार विमा योजना, कामगार कल्याण योजना (लेबर वेल्फेअर), भविष्य निर्वाह निधी कायदा, किमान वेतन कायदा, महिला कामगारांना बाळंतपणाची रजा अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या राजकीय व सामाजिक जीवनात केलेल्या अनेक लोकोपयोगी कार्यामध्ये कामगारांकरिता अनेक विशेष अधिकार व कायद्यातील तरतुदींमधून, सुरक्षा व सोईसुविधा त्यांच्या कार्यातून मिळवून दिलेल्या आहेत.

**संदर्भ सूची :**

1.कीर धनंजय , "डॉ.बाबासाहेब आंबेडकर", चौथी आवृत्ती, पाप्युलर प्रकाशन, मुंबई,१९८४

2.खेरमोडे चांगदेव भगवानराव, "डॉ.भीमराव रामजी आंबेडक्र चरित्र", वाय.बी.कांबळे प्रकाशन समिती, मुंबई , १९६६

3.क्षीरसागर आर.के., "प्रबुध्द भारतातील आलेख", आनंद प्रकाशन, औरंगाबाद, १९८०

4.कुलकर्णी भीमराव , "डॉ.बाबासाहेब आंबेडकर", सुविचार प्रकाशन, नागपूर,१९६६

5.कांबळे बी.सी., "समग्र आंबेडकर चरित्र", बी.सी.कांबळे प्रकाशन, मुंबई, १९८६